2016-17





2017-18






2018-19






PDEA
Mamasaheb Mohol College
Add-on Course
Corporate Training on
Latest
Technology trends
4th August 2017
Inaugration by : Hon. A. M. Jadhav
PDEA


PROJECT
Competition
KEEP THIS
LAB CLEAN





सकाळ
रविवार,
२४ जानेवारी २०१६
५

# मोहोळ महाविद्यालयाकडून तिकोणा किल्ल्याची स्वच्छता

## कुळे येथे शिबिरात पर्यावरणविषयक जनजागृती

**कोळवण, ता. २३ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व जिल्हा शिक्षण मंडळाच्या पुण्यातील मामासाहेब मोहोळ महाविद्यालयाचे (पौड रोड ) राष्ट्रीय सेवा योजनेचे हिवाळी शिबिर कुळे (ता. मुळशी) येथे झाले.

मंडळाचे सहसचिव ए. एम. जाधव यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. या वेळी उपसरपंच मनोज साठे व ग्रामस्थ उपस्थित होते. समारोपप्रसंगी मंडळाचे उपसचिव पी. ई. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. तुषार शितोळे व ग्रामस्थ उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियान राबवून गावातील अंतर्गत रस्ते, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व अंगणवाडी परिसर, ग्रामपंचायत कार्यालय तसेच मंदिर परिसराची श्रमदानातून सफाई केली. तसेच प्रभातफेरी, जलसंवर्धन, ऊर्जा संवर्धन, महिला सबलीकरण, लेक वाचवा अभियान, निर्मलग्राम अभियान, सर्वांगीण शाश्वत व ग्रामीण विकास, स्थानिक इतिहास लेखन, ग्रामसर्वेक्षण, वृक्षसंवर्धन, समाजप्रबोधनपर पथनाट्य आदी उपक्रम राबविण्यात आले. गाव ओळख, चला ज्योती सावित्रीला शोधूया, व्यक्तिमत्त्व विकास, माहिती अधिकार एक वरदान, आपत्ती व्यवस्थापन, दुर्ग संवर्धन आदी विषयांवर प्रबोधनपर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. दुर्ग संवर्धन मोहिमेंतर्गत विद्यार्थ्यांनी तिकोणा किल्ल्यावर स्वच्छता केली. कार्यक्रम अधिकारी प्रा. लक्ष्मण उकिर्डे, प्रा. सुवर्णा खोडदे, प्रा. संध्या जाधव, प्रा. अर्चना माळी, प्रा. ओंकार केने व ग्रामस्थांनी शिबिराचे संयोजन केले.

Scanned with CamScanner

प्रभात पुणे, रविवार, दि. १० जानेवारी २०१६



पिरंगुट: दुर्ग संवर्धन मोहिमेतंर्गत तिकोणा किल्ल्यावर श्रमदानातून स्वच्छता करताना मामासाहेब मोहोळ महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी शिक्षक

# कुळे येथे हिवाळी शिबिरात विद्यार्थ्यांकडून जनजागृती

पिरंगुट,दि.९ (प्रतिनिधी) - हिवाळी शिबिरानिमित्त घेण्यात आलेल्या राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या पौड रोड येथील मामासाहेब मोहोळ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी कुळे (ता.मुळशी) येथे पर्यावरण आणि स्वच्छतेबाबत जनजागृती केली.

कुळे येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि पुणे जिल्हा शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने २ ते ८ जानेवारी या कालावधीत हिवाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले. स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान या संकल्पनेवर हे विशेष श्रमसंस्कार शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे सहसचिव ए.एम. जाधव यांच्या हस्ते झाले. यावेळी उपसरपंच मनोज साठे व ग्रामस्थ उपस्थित होते. समारोपप्रसंगी पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे उपसचिव पी. ई. कुलकर्णी, प्राचार्य डॅ. तुषार शितोळे व ग्रामस्थ उपस्थित होते.

शिबिर कालावधीत विद्यार्थ्यांनी संपूर्ण गावात महास्वच्छता अभियान राबवून गावातील अंर्तगत रस्ते, जि. प. प्राथमिक शाळा व अंगणवाडी परिसर, ग्रामपंचायत कार्यालय तसेच मंदिर परिसराची श्रमदानातून सफाई केली. तसेच प्रभातफेरी, जलसंवर्धन, उर्जा संवर्धन, महिला सबलीकरण, लेक वाचवा अभियान, निर्लग्राम अभियान, सर्वांगीण शाश्वत व ग्रामीण विकास, स्थानिक इतिहास लेखन, ग्रामसर्वेक्षण, वृक्षसंवर्धन, समाजप्रबोधनपर पथनाट्य आदी उपक्रम राबविण्यात आले होते.

गावओळख, चला ज्योती सावित्रीला शोधुया, व्यकितमत्त्व विकास, माहिती अधिकार एक वरदान, आपत्ती व्यवस्थापन, दुर्ग संवर्धन आदी विषयावर प्रबोधनपर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. दुर्ग संवर्धन मोहिमेतंर्गत विद्यार्थ्यांनी तिकोणा किल्लूयावर श्रमदानातून स्वच्छता केली.

शिबिराचे संयोजन कार्यक्रम अधिकारी प्रा. लक्ष्मण उकिर्डे, प्रा. सुवर्णा खोडदे, प्रा. संध्या जाधव, प्रा. अर्चना माळी, प्रा. ओंकार केने व ग्रामस्थांनी केले होते.

केली. तसेच प्रभातफेरी, जलसंवर्धन, शिबिराचे संयोजन केले.

सामना





## ■ सिंहगड स्वच्छता अभियान संपन्न

पुणे : पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मामासाहेब मोहोळ महाविद्यालय
राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने किल्ले सिंहगड येथे स्वच्छता
मोहीम राबविण्यात आली. यामध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी सहभागी
झाले होते. स्वच्छता मोहिमेचे संयोजन प्राचार्या डॉ. सुषमा भोसले व
डॉ. महेंद्र अवघडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी प्रा.
उकिर्डे एल. जी., डॉ. राठोड बी. एल., प्रा. अशोक शेळके यांनी केले.